निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना थकबाकीचा तिसरा हप्ता प्रदान करण्याबाबत....
अंमलबजावणी संदर्भात सूचना.

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

परिपत्रक, क्रमांक: सेनिवे-१००१/२७९/सेवा-४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक - १० ऑक्टोबर २००१

पहा :- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- सेनिवे-१०९९/३०२/सेवा-४, दिनांक १५.११.१९९९
(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- सेनिवे-१०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५.११.१९९९
(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे-१०९९/३४४/सेवा-४, दिनांक ०५.०१.२०००
(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे-१००१/३८/सेवा-४, दिनांक १६.०१.२००१
(५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे-१००१/४०/सेवा-४, दिनांक २४.०१.२००१
(६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - सेनिवे-१००१/२७४/सेवा-४, दिनांक १.१०.२००१

## परिपत्रक

वर निर्देशिलेल्या अनुक्रमांक (१) येथील आदेशांनुसार १ जानेवारी १९९६ रोजी किंवा त्यानंतर निवृत्त/मृत झालेल्या /होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी त्यांचे निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन/उपदान/ निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यांमध्ये सुधारणा करण्यांबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या आदेशानुसार संबंधित निवृत्तिवेतनधारक /कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांचे प्रकरणी, यथास्थिती, निवृत्तिवेतन, उपदान आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण निर्धारित करणे आणि त्याचे तात्पुरत्या तसेच अंतिम स्वरुपात प्रदान करणे याबाबतची विशेष कार्यपध्दती सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद -१३ मध्ये विहित करण्यात आलेली आहे. वरील अनुक्रमांक-(६) येथील शासन निर्णयान्वये निवृत्तिवेतनधारकांना तिसऱ्या हप्त्याचे प्रदान करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. या आदेशांची अंमलबजावणी अधिक सुलभतेने व्हावी यादृष्टीने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२. प्रचलित कार्यपध्दतीनुसार तात्पुरते निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन व उपदान यांच्या रकमांची देयके, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नमुना २१ व निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या रकमांची देयके महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नमुना ४५-अ मध्ये कोषागारात सादर केली जातात. निवृत्तिवेतन, उपदान व निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या रकमांसंबधीची ही देयके जरी एकाच प्रधान शीर्षाखाली खर्ची पडत असली तरी त्यांचे उपशीर्ष वेगवेगळे असल्यामुळे, तसेच या रकमांबाबतची माहिती त्वरीत उपलब्ध व्हावी या दृष्टीने विभाग/कार्यालय प्रमुखांनी निवृत्तिवेतन, उपदान व निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण, या रकमांसंबंधीचे एकच देयक सादर न करता, या प्रत्येकासंबंधीचे स्वतंत्र देयक, (वरील नमुन्यातच) संबंधित कोषागार/उपकोषागार कार्यालयास सादर करावे. विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख यांनी याबाबतच्या मंजूरी आदेशांच्या प्रत्येकी दोन प्रती देयकांसोबत जोडणे आवश्यक आहे. कोषागार अधिकारी यांनी देयके मंजूर करतांना सदर मंजूरी आदेशाची एक प्रत त्यांच्या अभिलेख्यात ठेवावी व या आदेशाच्या प्रतीच्या आधारे कोषागार अधिकारी यांनी संबंधित निवृत्तीवेतनधारकास (जर तो त्यांच्याच कोषागारातून नियमित निवृत्तिवेतन घेत असल्यास), त्यास प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाच्या

अंशराशीकरणाच्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्याच्या प्रदानाच्या तारखा त्यांच्या अभिलेख्यात नोंदवाव्यो. निवृत्तिवेतनधारकास मासिक निवृत्तिवेतनाचे अतिप्रदान झालेले असेल तर अशी निवृत्तिवेतनाच्या अतिप्रदानाची रक्कम परिगणित करुन, ती पुढील मासिक निवृत्तिवेतनातून वसूल करण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी.

३. निवृत्तिवेतन, कुटुंब निवृत्तिवेतन, उपदान व निवृत्तिवेतनाचा अंशराशीकरणाच्या थकबाकीच्या तिसऱ्या हप्त्याची रक्कम परिगणित करुन ती देयकासोबतच्या मंजूरी आदेशांमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात यावी. आदेशाचा नमुना सोबत जोडला आहे. <u>(जोडपत्र १)</u>

४. वरील अनुक्रमांक (६) येथील शासन निर्णयानुसार १ जानेवारी १९९६ ते ३० जून १९९९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या/सेवेत असतानां मृत्यु पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांबाबत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी तिसऱ्या हप्त्याचे तात्पुरत्या स्वरुपात प्रदान ३१ मार्च २००२ पूर्वी करावयाचे आहे. **<u>तथापि, काही प्रकरणी उपरोक्त निवृत्तिवेतनधारकांचे सुधारित दराने निवृत्तिवेतन निश्चित होऊन अंतिम "निवृत्तिवेतन प्रदान आदेश" संबंधित महालेखापालांकडून मंजूर होऊन परस्पर कोषागारात येण्याची शक्यता आहे. ही शक्यता लक्षात घेता कोषागार/उपकोषागारांनी त्यांना परस्पर प्राप्त झालेल्या सदर प्राधिकारपत्रानुसार १ जानेवारी १९९६ ते ३० जुन १९९९ या कालावधीच्या थकबाकीचे प्रदान करु नये,</u>** कारण या थकबाकीचे आहरण, विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख करणार आहेत. मात्र महालेखापाल, यांचेकडून प्राप्त झालेल्या प्राधिकारपत्राचे आधारे **१ जुलै १९९९** पासूनच्या मासिक निवृत्तिवेतनाचे सुधारित दराने प्रदान संबंधित कोषागार/उपकोषागारांनी करावयाचे आहे. विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या तात्पुरत्या निवृत्तिवेतन मंजूरी आदेशान्वये यापूर्वी दिनांक **१ जुलै १९९९** पासूनचे निवृत्तिवेतन प्रदान केले गेले असल्यास महालेखापालांकडून प्राप्त झालेल्या "निवृत्तिवेतन प्रदान आदेशात" दर्शविलेल्या दरानेच त्याचे प्रदान झाले आहे किंवा कसे याबाबत खात्री करुन घेणे आवश्यक आहे. तफावत असल्यास खालील परिच्छेदांमध्ये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील. दिनांक ३०.६.१९९९ रोजी (मध्यान्हानंतर) सेवा निवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या प्रकरणी कोषागारांनी निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या थकबाकीचे प्रदान प्रचलित पध्दतीने व एक रकमी करावे असे आदेश यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेले आहेत, तरी अशा प्रकरणी त्यानुसार कार्यवाही केली जावी.

५. ज्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या प्रकरणी या आदेशांनुसार थकबाकीच्या तिसऱ्या हप्त्याचे प्रदान केल्यानंतर सुधारित निवृत्तिवेतनविषयक लाभ, संबंधित महालेखापालांकडून अंतिमतः प्राधिकृत करण्यात येतील, अशा प्रकरणी अनुसरावयाची कार्यपध्दती शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१००१/२७४/सेवा-४, दिनांक १ ऑक्टोबर २००१ च्या परिच्छेद क्र.३ मध्ये विहित करण्यात आली आहे, तिचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या संदर्भात अनुषंगाने याठिकाणी अशीही सूचना करण्यात येत आहे की, जर महालेखापालांनी अंतिमतः प्राधिकृत केलेल्या उपदानाच्या रकमेपेक्षा निवृत्तिवेतनधारकास, कार्यालय / विभाग प्रमुख यांचेकडून प्रदान करण्यात आलेली उपदानाच्या तीन हप्त्यांची एकूण रक्कम कमी असेल तर अशा उर्वरित फरकाच्या रकमेचे प्रदान करण्यासाठी संबंधित विभाग / कार्यालय प्रमुखांने विहित नमुन्यात म्हणजेच महाराष्ट्र

कोषागार नियम, १९६८ मधील नमुना क्र.३५ मध्ये आवश्यक ते देयक, विभाग / कार्यालय प्रमुखांची देयके ज्या कोषागारातून आहरीत केली जातात, त्या कोषागारात सादर करावे.

६. ज्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या प्रकरणी या आदेशानुसार तिसऱ्या हप्त्याचे प्रदान करण्यापूर्वी सुधारित निवृत्तिवेतनविषयक लाभ, महालेखापालांकडून अंतिमतः प्राधिकृत करण्यात आले आहेत, अशा प्रकरणी अनुसरावयाची कार्यपध्दती शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१००१/२७४/सेवा-४, दिनांक १ ऑक्टोबर २००१ च्या परिच्छेद क्र.४ मध्ये विहित करण्यात आली आहे, तिचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. ज्या प्रकरणी निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक वरील अनुक्रमांक (६) येथील आदेशांनुसार कार्यवाही करण्यापूर्वी मृत झाला असेल अशा प्रकरणी निवृत्तिवेतन / उपदान / निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या अतिप्रदानाची रक्कम संबंधित निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या हयातकालिन थकबाकीतून वसूल करावी.

८. वरील अनुक्रमांक (६) येथील शासन निर्णयानुसार तिसऱ्या हप्त्याचे प्रदान केल्यावर संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी, निवृत्तिवेतनधारक सध्या ज्या कोषागार कार्यालयातून नियमित निवृत्तिवेतन घेत असेल, त्या कोषागार अधिकाऱ्यांना प्रमाणक क्रमांक व दिनांकासह अंशराशीकरणाच्या प्रदानाचा तपशिल कळवावा. हा तपशिल कळवितांना त्या निवृत्तिवेतनधारकांचा निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक व निवृत्तिवेतन घेत असलेल्या बँकेचे नांव व शाखा हे कळवावे. हे कळविल्यानंतर संबंधित कोषागार अधिकारी यांनी अंशराशीकरणाच्या प्रदानाचा तपशिल संबंधित निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन लेखा परीक्षण नोंदवहीत न चुकता नोंदवावा.

९. ३१ मार्च अखेर कोषागार/उपकोषागारांमध्ये होणारी देयकांची गर्दी टाळण्यासाठी विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी थकबाकीच्या तिसऱ्या हप्त्याची देयके शक्यतो <u>१५ मार्च २००२</u> पूर्वी कोषागार/उपकोषागारांकडे सादर करावी.

१०. सर्व विभाग / कार्यालय प्रमुखांनी / अधिदान व लेखा अधिकारी / कोषागार अधिकाऱ्यांनी / उपकोषागार अधिकाऱ्यांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वसन्त वा.चौधरी,**
शासनाचे उप सचिव.

प्रति,

भारत सरकारचे सचिव,वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
उपसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण भवन, नवी मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (२५ प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग,मंत्रालय, मुंबई (१०० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
<u>निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.</u>
*पत्राद्वारे.

# <u>जोडपत्र -१</u>

*(केवळ १.१.९६ ते ३०.६.१९९९ या कालावधीतील निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांकरिता)*

क्रमांक- कार्यालयाचे नाव

दिनांक :-

विषय :- <u>निवृत्तीवेतनविषयक लाभांच्या थकबाकीचे प्रदान - तिसरा हप्ता</u>

श्री./श्रीमती.____________________

निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक :-____________

**<u>आदेश</u>**

१) श्री./श्रीमती.________________हे/हया__________या कार्यालयात/खात्यात __________पदावर कार्यरत असतांना दिनांक__________रोजी सेवा निवृत्त झाले/झाल्या/मृत्यू पावले/पावल्या.

सध्या त्यांचे निवृत्तिवेतन त्यांना__________या कोषागारातून__________ बँकेच्या ________शाखेतून अदा करणेत येत आहे.

*किंवा*

त्यांना तात्पुरते निवृत्तिवेतन ____________________या कार्यालयामार्फत अदा करण्यांत येत आहे ( जे लागू नसेल ते खोडावे.)

२) श्री./श्रीमती____________________ यांच्या मृत्यूनंतर श्री./श्रीमती ____________ यांना कुटुंब निवृत्तिवेतन__________कोषागारातून__________ बँकेच्या__________शाखेतून अदा करणेत येत आहे. (दिनांक ____________पासून)

(श्री./श्रीमती________________हे त्यांच्या सेवानिवृत्तिनंतर______________या दिनांकास निधन पावल्यामुळे दिनांक ३०/६/१९९९ पर्यंतची थकबाकी त्यांचे वारस श्री./श्रीमती__________ __________यांना देय होईल. (दिनांक____________पासून)

३) अ) श्री./श्रीमती. ____________________ यांचे प्रकरणी सुधारित वेतनाचे आधारे निश्चित होणाऱ्या निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन विषयक लाभाच्या थकबाकीचे दोन हप्ते यापूर्वीच संबंधित शासन निर्णयातील तरतुदीनुसार मंजूर करण्यांत आले असून, त्या थकबाकीचे प्रदान त्यांना / त्यांचे वारसास खालीलप्रमाणे करण्यांत आले आहेत :-

| | निवृत्तिवेतनाची थकबाकी (रुपये) | उपदानाची थकबाकी (रुपये) | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची थकबाकी (रुपये) | अंशराशीकरणा ची थकबाकी प्रत्यक्षात प्रदान करण्यात आली तो दिनांक |
|---|---|---|---|---|
| (i) पहिला हप्ता | | | | |
| (ii) दुसरा हप्ता | | | | |
| दोन हप्त्यांच्या प्रदानांची एकूण रक्कम (i+ii) | | | | |

निवृत्तिवेतनाच्या अंशाराशीकरणाच्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्याच्या प्रदानानंतर त्यांच्या मू[illegible] निवृत्तिवेतनातून अनुक्रमे रुपये ______________व रुपये ______________ची कपात करण्याचे आदे[illegible] काढण्यात आले आहेत.

३) ब) उपरोक्त दोन्ही हप्ते प्रदान करतांना त्यांना सुधारित वेतनावर आधारित **एकूण देय निवृत्तिवेतन विषयक लाभ** खालीलप्रमाणे विचारात घेण्यांत आले आहेत. (दुसऱ्या हप्त्याचे वेळी सुधारित केल्यानुसार)

| | | |
|---|---|---|
| (i) | (i) निवृत्तिवेतन (मासिक) :- | रुपये ______________ |
| (ii) | (ii) उपदान :- | रुपये ______________ |
| (iii) | (iii) निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम :- | रुपये ______________ |
| (iv) | कुटुंब निवृत्तिवेतन :- (वाढीव दराने)<br>कुटुंब निवृत्तिवेतन :- (सर्वसाधारण दराने) | रुपये ______________<br>रुपये ______________<br>(दि. पासून) |

४)(अ) या कार्यालयाने सुधारित वेतनाच्या आधारे निवृत्तिवेतनविषयक लाभ प्राधिकृत करण्याबाबतचे प्रकरण महालेखापाल, मुंबई/ नागपूर यांना सादर केले होते. महालेखापाल, मुंबई/नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक:- ______________________ दिनांक __________________ नुसार प्राधिकृत केले असून त्यानुसार त्यांना पुढील अ.क्र.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तिवेतनविषयक लाभ अंतिमरित्या देय होतात.(सोबत प्राधिकार पत्रांच्या साक्षांकित प्रती जोडण्यात येत आहेत.)

*किंवा*

(ब) त्यांची दिनांक १.१.१९९६ रोजीची वेतन पडताळणी, वेतन पडताळणी पथकाकडून करण्यांत आली असून त्यानुसार त्यांना सुधारित निवृत्तिवेतनविषयक लाभांची थकबाकी देय होते. त्याबाबतचा तपशील पुढील अ.क्र.५ मध्ये नमूद करण्यांत आला आहे.

*किंवा*

(क) त्यांचे प्रकरणी दिनांक ०१/०१/१९९६ ची सुधारित वेतन पडताळणी अद्याप झालेली नसून वेतन पडताळणी पथकाने त्यांच्या प्रकरणी काढलेल्या आक्षेपांचे अनुषंगाने वेतन निश्चितीची फेरतपासणी या कार्यालयाच्या स्तरावर करण्यात आली असून त्या आधारे त्यांना पुढील अ.क्र.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंतिमरित्या निवृत्तिवेतनविषयक लाभांची थकबाकी अंतिमतः देय होते. हे लाभ परिगणित करताना वेतन पडताळणीच्या संदर्भात काढण्यांत आलेले आक्षेप व त्यांचा निवृत्तिवेतनावर होणारा परिणाम विचारात घेऊन लाभ निश्चित करण्यांत आले आहेत.

५) उपरोक्त अनुक्रमांक ४ (अ)/(ब)/(क) च्या अनुषंगाने अंतिमरित्या निश्चित होणाऱ्या निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या थकबाकीचा तपशील हा खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| निवृत्तिवेतन / कुटुंबनिवृत्तिवेतन<br>(दि. ________ते दि.३०.६.१९९९ पर्यंत ची थकबाकी) | रुपये |
| उपदानाची थकबाकी | रुपये |
| निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची थकबाकी | रुपये |
| <u>एकूण देय रक्कम</u> | रुपये |

वरील अनुक्रमांक ४ (अ)/(ब)/(क)मध्ये उल्लेखिलेल्या निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या परिगणनेचा तपशील सोबतच्या जोडपत्र-२ व जोडपत्र-३ मध्ये नमूद करण्यात आला आहे.

६) वरील अनुक्रमांक (५) मध्ये अंतिमरित्या निश्चित करण्यात आलेली थकबाकी व अनुक्रमांक (३) मधील प्रत्यक्ष प्रदान करण्यांत आलेली थकबाकी यांची तुलना करता प्रस्तुत प्रकरणी श्री./श्रीमती______________ यांना तिसऱ्या व अंतिम हप्त्यापोटी खालील निव्वळ फरकाच्या रकमा देय ठरतात.

| | निवृत्तिवेतन (रुपये) | उपदान (रुपये) | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम (रुपये) | अंशराशीकरणाच्या रकमेच्या प्रदानाची तारीख |
|---|---|---|---|---|
| (अ) सुधारित निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या थकबाकीच्या अंतिमत: निश्चित केलेल्या रकमा | | | | |
| (ब) प्रत्यक्ष प्रदान करण्यात आलेली थकबाकीच्या दोन्ही हप्त्यांची एकूण रक्कम (वरील अ.क्र.३ नुसार) | | | | |
| (क) तिसऱ्या हप्त्यापोटी निव्वळ देय रक्कम (फरक)(अ वजा ब) | | | | |

७) या आदेशान्वये श्री./श्रीमती______________________ यांना तिसऱ्या हप्त्याची रक्कम खालीलप्रमाणे मंजूर करण्यांत येत आहे :-

| | |
|---|---|
| निवृत्तिवेतनातील फरक | रुपये ____________ |
| उपदानातील फरक | रुपये ____________ |
| अंशराशीकरणाच्या रकमेतील फरक | रुपये ____________ |
| ***तिसऱ्या हप्त्याची एकूण रक्कम*** | रुपये ____________<br>(अक्षरी रुपये ---------------------------) |

८) श्री./श्रीमती__________________यांचे निवृत्तिवेतन रुपये ----------- इतके निश्चित करण्यांत आले आहे व या सुधारित निवृत्तिवेतनाच्याआधारे त्यांना रुपये__________इतक्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम देय होत आहे. त्यांना आतापर्यंत प्रदान करण्यात आलेल्या अंशराशीकरणापोटी खालीलप्रमाणे निवृत्तिवेतन कमी करण्याचे आदेशित करण्यात आले आहे :-

| | | |
|---|---|---|
| (अ) | मूळ असुधारीत निवृत्तिवेतनावर आधारित अंशराशीकरणाची रक्कम प्रदान करण्यात आल्यानंतर निवृत्तिवेतनातून कमी करण्यात आलेली रक्कम | रुपये________ |
| (ब) | पहिल्या हप्त्याच्या प्रदानानंतर सुधारित निवृत्तिवेतनातून कमी करण्यात आलेली (अतिरिक्त) रक्कम | रुपये________ |
| (क) | दुसऱ्या हप्त्याच्या प्रदानानंतर सुधारित निवृत्तिवेतनातून कमी करण्यात आलेली (अतिरिक्त) रक्कम | रुपये________ |
| (ड). | आता आज अखेर म्हणजेच तिसऱ्या हप्त्याच्या प्रदानापूर्वी सुधारित निवृत्तिवेतनातून कमी करण्यात येत असलेली एकूण रक्कम.(अ+ब+क) | रुपये________ |

आता तिस-या हप्त्यात देण्यात येणाऱ्या अंशराशीकरणाच्या रकमेच्या परिणामी त्यांच्या निवृ- रुपये_________________ इतक्या रकमेची कपात अंशराशीकरणाच्या थकबाकीच्या तिसऱ्या हप्त्याच्या रक्कमेच्या प्रदानाच्या दिनांकापासून करण्यात यावी असे आदेशित करण्यात येत आहे. ही कपात विचारात घेता त्यांच्या निवृत्तिवेतनातून अंशराशीकरणामुळे एकूण रुपये_____________ इतक्या रक्कमेची कपात होऊन त्यांच्या निवृत्तिवेतनाची उर्वरित रक्कम दरमहा रुपये____________________________ संबंधित निवृत्तिवेतनधारकांना यापुढे देय राहील. तसेच मूळ निवृत्तिवेतनावरील महागाई भत्ता प्रचलित दराने अनुज्ञेय राहील.

९. थकबाकीच्या तिसऱ्या हप्त्याच्या प्रदानाची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर, निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या रकमेचा तिसरा हप्ता ज्या दिनांकास प्रदान केलेला असेल तो प्रदानाचा दिनांक, श्री./श्रीमती ____________________________ हे ज्या कोषागारातून निवृत्तिवेतन घेत आहेत, त्या कोषागार अधिकाऱ्यास सात दिवसांचे आत विहित नमुन्यांत कळविण्यात येईल व तो सदर मुदतीत न कळविल्यास होणाऱ्या अतिप्रदानास हे कार्यालय जबाबदार राहील.

**सोबत :- वरीलप्रमाणे.**

**कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख.**

प्रत:-

१) संबंधित निवृत्तिवेतनधारक श्री.___________________________________ यांना कळविण्यांत येते की, निवृत्तीवेतनाच्या अंशराशीकरणाच्या थकबाकीचा तिसरा हप्ता प्रदान झाल्याच्या दिनांकापासून त्यांच्या निवृत्तिवेतनातून रुपये_______________ इतकी कपात करण्यात येईल, याची त्यांनी कृपया नोंद घ्यावी.

२) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२,नागपूर.

३) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालय,
(जेथून निवृत्तिवेतनविषयक लाभ/थकबाकी काढण्यात येणार आहे, ते कार्यालय.)

४) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालय,
(जेथून निवृत्तिवेतनधारक नियमित निवृत्तिवेतन घेत आहे/घेणार आहे, ते कोषागार कार्यालय.)

## जोडपत्र-२

श्री./श्रीमती.________________________ यांना देय असणा-या निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या थकबाकीचा तपशील-

**( थकबाकीचा तिसरा हप्ता)**

निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक : ____________________

| लाभाचा प्रकार | महालेखापालांनी सुधारीत केलेली थकबाकीच्या तिन्ही हप्त्यांची एकूण रक्कम (जोडपत्र-१ च्या परिच्छेद क्रमांक ५ प्रमाणे) | महालेखापालांनी सुधारणा करण्यापूर्वी (म्हणजेच पहिला व दुसरा हप्ता प्रदान करताना) परिगणित करण्यात आलेली थकबाकीची तिन्ही हप्त्यांची एकूण रक्कम | प्रदान करण्यात आलेल्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्यांच्या रक्कमा | महालेखापालांनी सुधारित केल्यानुसार अनुज्ञेय ठरणाऱ्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्याच्या रकमा | समायोजित करावयाचा फरक (स्तंभ क्र. ४ व ५ मधील फरक) | तिसऱ्या हप्त्याची देय रक्कम | अ.क्र. ६ मधील फरक समायोजित करुन आता मंजूर करणेत येत असलेली तिसऱ्या हप्त्याची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १)निवृत्तिवेतन/<br>२)उपदान/<br>३)अंशराशीकरणाची रक्कम | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |
| टीप :- | *ज्या प्रकरणी स्तंभ क्रमांक ६ प्रभावीत होत असेल त्याच प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग, दिनांक ०५/०१/२००० मधील जोडपत्र ४ जोडावे.* | | | | | | | |

कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख

# जोडपत्र-३

कार्यालयाचे नांव :-

दिनांक :-

प्रति,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / कोषागार अधिकारी,

*(जेथून निवृत्तिवेतनधारक नियमित निवृत्तिवेतन घेत आहे ते कोषागार)*

विषय :- निवृत्तीवेतनविषयक लाभाच्या थकबाकीचे प्रदान - तिसरा हप्ता.

श्री./श्रीमती.____________________

पी.पी.ओ.क्रमांक :____________________

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, श्री./ श्रीमती.____________ हे/हया आपल्या कोषागारातून____________ बँकेच्या____________ या शाखेतून खाते क्रमांक__________ द्वारे निवृत्तिवेतन घेत आहेत.

त्यांना निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या थकबाकीचा तिसरा हप्ता या कार्यालयाचे आदेश क्रमांक ______________ नुसार मंजूर करण्यात आला असून त्यातील निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम रुपये __________दिनांक__________रोजी प्रत्यक्ष प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या मासिक निवृत्तिवेतनातून दिनांक__________पासून रुपये__________इतकी कपात करण्यात यावी.

आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

आपला,

कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख

सोबत :- वरीलप्रमाणे.